पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भुलेश्वर स्टील आणि अलॉयज प्रा.लि. गट क्रं.२३३,२५०,२५२, यवत, ता.दौंड, जि.पुणे असलेल्या प्रस्तावित मेटार्लिकल इंडस्ट्री ( विद्यमान युनिटचा विस्तार संदर्भात ) पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भुलेश्वर स्टील आणि अलॉयज प्रा.लि. गट क्रं.२३३,२५०,२५२, यवत, ता.दौंड, जि.पुणे असलेल्या प्रस्तावित मेटार्लिकल इंडस्ट्री ( विद्यमान युनिटचा विस्तार संदर्भात ) पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १५/१२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. जयंत डोके, क्षेत्र अधिकारी उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-१, यांनी ज्योती कदम, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती व इतर सदस्य तसेच प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे म.प्र.नि. मंडळ आणि जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्यातर्फे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदर प्रकल्पास दिनांक ०५/१०/२०२३ रोजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांनी Terms of Reference (ToR) मंजूर करण्यात आला. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांने प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करुन भारत सरकारच्या पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार प्रकल्प प्रवर्तक मेसर्स भुलेश्वर स्टील आणि अलॉयज प्रा.लि. गट क्रं.२३३,२५०,२५२, यवत, ता.दौंड, जि.पुणे असलेल्या प्रस्तावित मेटार्लिकल इंडस्ट्री ( विद्यमान युनिटचा विस्तार संदर्भात) पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठीचा अर्ज म.प्र.नि.मंडळास प्राप्त झाला.

जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक ०७/११/२०२३ च्या पत्रानुसार जनसुनावणीसाठी दिनांक १५/१२/२०२३ ही तारीख निश्चित करण्यात आली. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. ई- ८९ /२०२३, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी(डब्लुपीसी)/पीएच/बी-

२३१२११-एफटीएस-०२६७, दिनांक ११/१२/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आलीः-

१. **ज्योती कदम** - **अध्यक्ष**
मा. निवासी उपजिल्हाधिकारी-पुणे तथा
(अप्पर जिल्हादंडाधिकारी,पुणे)

२. **श्री. रवींद्र आंधळे** - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

३. **श्री नितीन शिंदे,** - **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर सदर प्रकल्पाची जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आज शुक्रवार दिनांक १५/१२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता असल्याची जाहिर सूचना दिनांक १३/११/२०२३ च्या स्थानिक मराठी वृत्तपत्र लोकसत्ता व इंग्रजीत राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यात प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप जनतेस, पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्था यांना करण्यात आलेले होते.

तसेच या प्रकल्पाचे दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे., जिल्हा उद्योग केंद्र, पुणे. , जिल्हा परिषद कार्यालय, पुणे. , प्रादेशिक कार्यालय व उप प्रादेशिक कार्यालय पुणे-१, मप्रनि मंडळ, जोग सेंटर, २ रा व ३ रा मजला, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे- ४११ ००३., मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड क्र. ७, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई-२२., झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरीयाट बिल्डींग, तलमजला, ईस्ट विंग, सिव्हील लाईन, नागपूर-४४० ००१., पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-

३२.,उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, दौंड, ता.दौंड, जि.पुणे., तहसिलदार, तहसिल कार्यालय - दौंड, ता.दौंड , जि. पुणे. , ग्रामपंचायत कार्यालय, यवत, भांडगाव, पोंढे, भारतगाव, खुटबाव, खोर, धुमाळीचा मळा, ता.दौंड, जि. पुणे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेत स्थळ येथे उपलब्ध आहेत असे कळविण्यात आलेले होते.

आयोजक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी लेखी सूचना द्यावयाच्या असल्यास त्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे देण्यात याव्यात. त्या अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर करता येतील. ज्यांना तोंडी प्रश्न विचारायचे असतील, त्यांनी सादरीकरणानंतर आपले नांव व गाव स्पष्टपणे सांगून मांडावेत. प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार त्या प्रश्नांची उत्तरे देतील. सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येऊन ते म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण विभागास सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्षांनी, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना व त्यांच्या तांत्रिक सल्लागारांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतून करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचनाअसल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाने नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागारांनी पर्यावरण विषयक प्रकल्पाचे सादरीकरण केले. या सादरीकरणामध्ये सल्लागारांनी सांगितले की, ईआयए अणि सूचना आणि त्यानंतरच्या दुरुस्तीनुसार सध्याच्या प्रकल्पाला (टीएमटी बार) पर्यावरण मंजुरीची आवश्यकता नव्हती. परंतु आता MOEF अधि सूचना क्र. एस.ओ.३२५० (ई) दिनांक २० जुलै २०२२ नुसार रोलिंग मिलला पर्यावरण मंजुरी घेणे आवश्यक झाले आहे.

सध्याचे उत्पादन प्रमाण ११००० मेट्रिक/ टन महिना (टीएमटी बार) ते ५०००० मेट्रिक/ टन महिना (टीएमटी बार , एम.एस. बिलेट्स, एम.एस. फ्लॅटस्, एम.एस. स्ट्रक्चरल स्टील, एम.एस.

पाईप, अलॉयज स्टील) पर्यंत विस्तारित करण्याची योजना आखली आहे. सध्याच्या प्लांटच्या आवारात उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेवर प्रस्तावित विस्तार केला जाईल. एकूण क्षेत्रफळा पैकी ३३.८०% इतक्या जागेमध्ये हरितपट्टा विकसित केला जाईल. प्रकल्पासाठी एकूण लागणारे पाणी २८६.२० घनमीटर / प्रतिदिन इतके आहे त्यापैकी ताजे पाणी २६१.६५ घनमीटर / प्रतिदिन आणि पुनर्वापर कलेले पाणी २४.५५ घनमीटर / प्रतिदिन (एसटीपी आणि डीएम प्लांट) इतके आहे. सध्याचा पाण्याचा स्रोत हा भूजल (बोअरवेल) आहे आणि केंद्रीय भूजल प्राधिकरण (CGWA) कडून ९८ घनमीटर / प्रतिदिन पाणी वापरण्याची परवानगी घेण्यात आली आहे. प्रस्तावित प्रकल्पासाठी अर्ज प्रक्रिया सुरु आहे. तसेच २३.०८ घनमीटर / प्रतिदिन इतके सांडपाणी निर्माण होणार असून त्यावर २५ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्यात येणार असून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर हरित पट्टा विकासासाठी पुनर्वापर करण्यात येईल. फर्नेससाठी वायु प्रदूषण नियंत्रणासाठी सध्याच्या रीहीटिंग फर्नेसला ३० मीटर उंचीची चिमणी त्यासोबत वेट स्क्रबर धूर व धूळ कमी करणारी यंत्रणा लावलेली आहे. तसेच प्रस्तावित प्रकल्पासाठी इंडक्शन फर्नेसला ३२ मीटर उंचीच्या २ चिमणी त्यासोबत बॅग फिल्टर धूर व धूळ कमी करणारी यंत्रणा लावली जाईल. तसेच प्रकल्पाने करावयाचे उपक्रम व त्यावरील परिणाम या संदर्भातील सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास माहिती दिली.

सादरीकरणानंतर पर्यावरण जनसुनावणीचे समन्वयक, श्री.नितीन शिंदे यांनी जनतेला प्रश्न, हरकती व सूचना मांडण्याची विनंती केली.

<u>**खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला व त्यास पर्यावरण सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेली उत्तरेः-**</u>

१. **श्री. नीलेश परटकर, पुणे**- उत्पादन प्रक्रियेतून कोणते सांडपाणी सोडले जाणार आहे, याची माहिती द्यावी, असे विचारले.
प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, सिंचन व्यवस्थेतून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यासाठी २५ KLD क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात येणार असून त्याचा उपयोग परिसरातील बागायती कामासाठी केला जाणार आहे.

२. **<u>श्री. अनिकेत मलभरे, यवत, पुणे</u>**- या प्रकल्पावर सर्फिंग करताना आवाज वाढू शकतो का? प्रकल्पाच्या प्रवर्तकाने सांगितले की, प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान आवाजाची पातळी वाढू शकते आणि प्रकल्प सुरू झाल्यानंतर कामगारांना आवाजाची पातळीचा त्रास होऊ नये त्याकरीता संरक्षणात्मक उपकरणे पुरवली जातील.

३. **<u>श्री. संदीप यादव, यवत, पुणे</u>** - या प्रकल्पाचा गावाला काय फायदा होईल? त्यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील तसेच सीएसआर अंतर्गत आम्ही विविध उपाययोजना राबवू.

४. **<u>श्री. महेश बारवगाव, केडगाव</u>** या प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावली जाणार?
त्यावर प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, सदर प्रकल्पातून निर्माण होणारे पाणी पुन्हा वापरले जाणार आहे तसेच सांडपाण्यासाठी २५ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारून त्याचा उपयोग परिसरातील बागायती कामासाठी केला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

५. **<u>श्री. सुनंदा रेड्डी, हैदराबाद</u>** - या प्रकल्पाचे अभिनंदन करून काही सूचना दिल्या, पर्यावरण सुधारण्यासाठी, पावसाचे पाणी साठवून पाणी साठविण्याची व्यवस्था सुधारावी, जेणेकरून प्रकल्पाचा फायदा होईल, असे सांगितले, तसेच गावकऱ्यांशी संवाद साधून सामान्य झाडे व फळझाडे लावावीत. MOEF ची परवानगी लवकरात लवकर मिळावी, तसेच या प्रकल्पासाठी माझ्या शुभेच्छा.

६. **श्री चंद्रशेखर,** पर्यावरण यांनीही या प्रकल्पाला शुभेच्छा देण्यासाठी काही सूचना दिल्या, त्यांनी प्रकल्पाभोवतीचा हरित पट्टा सुधारण्याची सूचना केली, तसेच प्रकल्पाच्या आजूबाजूच्या गावकऱ्यांना १०० टक्के रोजगार संधी उपलब्ध करून देण्याची शिफारस केली. सीएसआर निधीतून आजूबाजूच्या गावांचाही विकास करावा, अशी सूचना करण्यात आली.

या प्रश्नांच्या उत्तरांनंतर, समितीने पुन्हा एकदा सामान्य जनतेला प्रस्तावित विस्तारित प्रकल्पासाठी विशेषत: पर्यावरणाच्या मुद्द्यांवर त्यांच्या सूचना किंवा हरकती देण्याचे आवाहन केले.

बैठकीत मांडण्यात आलेल्या सूचना, हरकतींचा समावेश सभेच्या इतिवृत्तात करण्यात येणार असल्याची माहिती जनसुनावणी समितीने दिली. तो अंतिम पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवालासह संबंधित प्राधिकरणाकडे सादर केला जाईल. त्यावर तज्ज्ञ समिती योग्य तो निर्णय घेईल.

असे दिसून आले की लोक यापुढे कोणतेही प्रश्न उपस्थित करत नाहीत किंवा कोणतीही समस्या मांडत नाहीत. त्यामुळे समितीच्या समन्वयकांनी सभा संपवण्याची विनंती अध्यक्षांना केली व त्यांचे आदेश घेऊन अध्यक्षांचे व उपस्थितांचे आभार मानून लोकजाहीर सूनावणी संपली असे जाहीर केले.

**(नितीन शिंदे)**
समन्वयक
उपप्रादेशिक अधिकारी, पुणे- १,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

**(श्री. रवींद्र आंधळे)**
सदस्य
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

**(ज्योती कदम)**
अध्यक्ष
मा. निवासी उपजिल्हाधिकारी-पुणे तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी,पुणे